लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा।
वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा।
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा।
तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा।
आरती ओवाळूं तुज कर्पूरगौरा ॥ जय देव जय देव ॥

कर्पूरगौरा भोळा नयनीं विशाळा।
अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा।
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा।
आरती ओवाळूं तुज कर्पूरगौरा ॥ जय देव जय देव ॥

www.MandirTheTemple.com
YouTube: @MandirTheTemple
Instagram: @MandirTheTemple
Facebook: /MandirTheTemple
अर्थ व विधि
QR स्कैन करें

देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें।
त्यामाजीं अवचित हळाहळ जें उठिलें।
तें त्वां असुरपणें प्राशन केलें।
नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा।
आरती ओवाळूं तुज कर्पूरगौरा ॥ जय देव जय देव ॥

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी।
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी।
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी।
रघुकुळटिळक रामदासा अंतरीं॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा।
आरती ओवाळूं तुज कर्पूरगौरा ॥ जय देव जय देव ॥